ARTHA ( Commercial Weekly )
Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख १७ जून, १९५९ | अंक २४

## विविध माहिती

**गुजरातमधील खनिजांचा शोध**—भारत सरकारनें पाठविलेल्या भूगर्भशास्त्रज्ञांच्या एका तुकडीनें उत्तर गुजरातमधील खनिज संपत्तीचा शोध करण्याचें काम चालविलें आहे. रत्नें, सोनें, दगडी कोळसा, इत्यादि खनिजें शोधण्यांत येत आहेत. तुकडीनें जमविलेले निरनिराळया प्रकारच्या मातीचे नमुने सरकारच्या मध्यवर्ति प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविण्यांत आले आहेत.

**अणुशक्तीचा नवा उपयोग**—अमेरिकेचे प्रसिद्ध अणुविज्ञानशास्त्रज्ञ डॉ. टेलर ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं भावी काळांत अणुशक्तीचा उपयोग करून मनुष्याला अप्रतिम अशा प्रकारचे हिरे बनवितां येतील. त्याचप्रमाणें, मनुष्याच्या सुखाला आवश्यक असणाऱ्या प्राणवायूसारख्याचीहि निर्मिति करतां येईल.

**कुटुंबनियोजनाची मोहीम**—मध्यप्रदेश सरकारनें चालू आर्थिक वर्षांत ९१,००० रुपयांचीं कुटुंबनियोजनाचीं साधनें कुटुंबनियोजन केंद्रांमार्फत वाटण्याचें ठरविलें आहे. साधनें ग्रामीण व नागरी अशा दोन्ही ठिकाणच्या केंद्रांतून वाटली जातील. ज्या कुटुंबांचें मासिक उत्पन्न १०० रुपयांच्या खाली असेल त्याला हीं कृतिम साधनें विनामूल्य देण्यांत येणार आहेत.

**सरकार गिरणी चालविणार**—कानपूर येथील ॲथरटन वेस्ट कापडाची गिरणी चालविण्यास घेण्याचें उत्तरप्रदेश सरकारनें ठरविलें आहे. ही गिरणी गेल्या एप्रिलमध्यें आर्थिक अडचण व कापडाचा शिल्लक सांठा ह्यामुळें बंद करण्यांत आली आहे. गिरणी बंद झाल्यामुळें २,७०० कामगार बेकार झाले आहेत. गिरणी चालविण्यासाठी एक कौन्सिल नेमण्यांत येणार आहे.

**प्लॅस्टिकचें जहाज**—मॉस्कोमधील एका बोट बांधण्याच्या कारखान्यानें संपूर्णपणें प्लॅस्टिकचें बनविलेलें एक जहाज तयार केलें असल्याची वार्ता आहे. नदींतून मालवातूक करण्यासाठी ते बांधण्यांत आले आहे. त्याची लांबी ५० फूट असून एंजिन तेलावर चालणारें आहे. त्याचें वजन धातूच्या सांगाड्यापेक्षा एक तृतिआंश कमी आहे.

**कागदासाठी लगद्याचा कारखाना**—आसाममधील नौगाँग जिल्ह्यांत कागद तयार करण्यासाठी लागणारा लगदा तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी तीन कोटी रुपयांची यंत्रसामुग्री लागेल. आसाममधील बांबूच्या बनाचा कच्चा माल म्हणून उपयोग करण्यांत येईल. असेच आणखीहि कांहीं कारखाने निघण्याइतका बांबू आसाममध्यें आहेत.

**साखरेच्या निर्यातीवर छापे**—दिल्लीमधून साखर बाहेर पाठविण्यास बंदी करण्यांत आली आहे. तेथील पोलिसांनीं पंजाबांत जाणाऱ्या साखरेनें भरलेल्या दोन मोटारी अडविल्या. दोन्ही मोटारींत मिळून सुमारें १६,००० रुपयांचीं साखरेचीं पोतीं होतीं. साखरेवरील निर्यातबंदी जाहीर करण्यांत आल्यापासून पोलिसांनीं ६०० मण साखर जप्त केली आहे.

**'अर्थशास्त्रा'ची रशिअन आवृत्ति**—प्राचीन भारतामधील 'अर्थशास्त्र' ह्या कौटिलीय ग्रंथाची रशिअन भाषेंतील आवृत्ति लेनिनग्रॅड येथें तयार करण्यांत आली आहे. कौटिलीय अर्थशास्त्राचें स्वरूप संपूर्णपणें अर्थशास्त्रीय नाहीं. त्याला राजकारणाचेंहि अंग आहे. रशिअन भाषांतराची पृष्ठसंख्या ७०० झाली आहे.

**कृत्रिम संगमरवराची निर्मिति**—फ्रान्समधील एका उद्योगपतीनें कृत्रिम संगमरवरी दगडाचा शोध लावला असून तो तयार करण्याचा कारखानाहि काढला आहे. त्याच्या मतानें हा कृत्रिम दगड खऱ्या संगमरवरी दगडापेक्षा तिप्पट अधिक कठीण आहे. शिवाय त्याची किंमतहि ६० टक्क्यांनीं कमी आहे. ह्या शोधामुळें इमारतींच्या बांधकामावर क्रांतिकारी परिणाम होईल असा त्याचा अंदाज आहे.

**रेल्वेच्या नोकरांसाठी घरें**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत आतांपर्यंत रेल्वेच्या नोकरांसाठी ३६,००० गाळे बांधण्यांत आले. रेल्वे बोर्डानें आणखी ९,००० गाळे बांधण्याचें ठरविलें असून हें काम चालू आर्थिक वर्षांतच पुरें करण्यांत येईल. दुसऱ्या योजनेंत रेल्वे-नोकरांच्या राहाण्याच्या सोयीसाठी २१ कोटी रुपये खर्च करण्यांत आले आहेत. चालू आर्थिक वर्षांत आणखी ७·५ कोटी रुपये खर्च करण्यांत येतील.

**चुंबनामागील रहस्य**—जर्मनीमधील फ्रँकफर्ट ह्या शहरीं सध्यां एक सर्कस खेळ करीत आहे. सर्कशींतील एका खेळांत ५ वर्षांचें एक अस्वल आपल्या मालकिणीचें चुंबन घेतें. मात्र मालकिणीच्या ओष्ठसंपुटांत अस्वलाला आवडणारा गोड खाऊ असतो. तो मुखगत करण्यासाठी अस्वल चुंबनाच्या सर्व हालचाली करतें.

**श्रीनगरचा पाणीपुरवठा**—श्रीनगर शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी १०॥ मैल लांबीचा सिंध कालवा खोदण्याचें काम पूर्ण झालें आहे. ह्या कामासाठी १० लाख रुपये खर्च आला. कालव्यांत पाणी सोडण्याचा समारंभ नुकताच झाला. नव्या कालव्यामुळें श्रीनगर शहराला आतां २४ तास पाण्याचा पुरवठा होऊं लागेल.

## भारताच्या प्रगतीसाठी अमेरिकेकडून रुपयांच्या चलनांतील कर्जें

### • प. लॉ ४८० कौंटरपार्ट फंडांचा विनियोग

भारतांत अमेरिकेंतील शेतीच्या उत्पादनाची विक्री करून अलीकडेच मिळालेल्या २० कोटि रुपयांमधून भारतांतील खाजगी धंद्यांना आणखी अधिक मदत मिळेल. 'पब्लिक लॉ ४८०' या कायद्याप्रमाणें अमेरिका स्वतःच्या शेतीचें उत्पादन मित्र-देशांना त्या देशांच्या चलनांत विकत देत असते.

भारत सरकार व अमेरिकन 'तांत्रिक सहकार्य मंडळ' (टी. सी. एम्.) यांच्यामध्यें अलीकडेच झालेल्या दोन करारांप्रमाणें 'इंडस्ट्रियल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' आणि 'इंडस्ट्रियल फायनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' या दोन संघटनांना प्रत्येकीं १० कोटि रुपयांचें कर्ज मिळालें आहे. यामुळें या दोन संघटनांचें सामर्थ्य वाढेल आणि भारतांतील खाजगी धंद्यांना आणखी अधिक आर्थिक साहाय्य देणें या संघटनांना शक्य होईल.

अर्थ खात्याचे संयुक्त चिटणीस श्री. एन्. सी. सेनगुप्ता यांनीं भारत सरकारतर्फे आणि 'टी. सी. एम्.'चे संचालक श्री. हॉवर्ड ई. हूस्टन यांनीं अमेरिकन 'तांत्रिक सहकार्य मंडळा' तर्फे करारावर सह्या केल्या.

भारत, अमेरिका व युनायटेड किंग्डम यांच्या कंपन्यांच्या हातीं संयुक्तपणें असलेल्या ५ कोटि रुपयांच्या वसूल (पेड अप) भांडवलावर १९५५ सालीं 'इंडस्ट्रियल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' ही संघटना स्थापन झाली. कर्जें देऊन, भाग विकत घेऊन व भांडवलाची हमी देऊन, ही संघटना भारतांतील खाजगी धंद्यांच्या विकासासाठी परदेशी व भारतीय खाजगी भांडवलांच्या मार्गीदारीस उत्तेजन देते.

या संघटनेला भारत सरकारकडून ७ कोटि, ५० लक्ष रुपयांचें बिन व्याजीं कर्ज मिळालें आहे. भारताला मिळालेल्या अमेरिकन पोलादाच्या विक्रींतून ही रक्कम आली आहे. त्याशिवाय, या संघटनेनें आंतरराष्ट्रीय बँकेशीं (इंटरनॅशनल बँक फॉर रीकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट) १ कोटि डॉलरच्या (सुमारें ५ कोटि रुपयांच्या) कर्जाची व्यवस्था केली आहे. त्या बँकेच्या मदतीनें ही संघटना परदेशी चलन मिळविण्यासाठीहि हातभार लावूं शकेल.

'इंडस्ट्रियल फायनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' ही संघटना भारत सरकारनें १९४८ सालीं स्थापन केली. ही संघटना देखील भारतांतील खाजगी धंद्यांना मध्यम व दीर्घ मुदतीचीं कर्जें देत असते.

उद्योगधंद्यांना आर्थिक मदत देणें चालू ठेवण्यासाठी, या 'कॉर्पोरेशन'ला दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या उरलेल्या काळांत आणखी २० कोटि रुपयांची गरज लागेल असा अंदाज आहे यांपैकीं निम्म्या, म्हणजे १० कोटि रुपयांची व्यवस्था प. लॉ ४८०' प्रमाणें मिळणाऱ्या कर्जांतून होऊं शकेल. उरलेली १० कोटि रुपयांची रक्कम कायम ठेवींतून किंवा रोख्यांच्या विक्रींतून उभारण्याचा 'कॉर्पोरेशन'चा विचार आहे.

मार्च महिन्याच्या मध्यकाळांत अमेरिकेनें भारताला 'पब्लिक लॉ ४८०' प्रमाणें १०० कोटि, ९० लक्ष रुपये दिले. भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मुदतींतील १३ नद्यांच्या विकासाच्या योजनांसाठी रुपयांच्या चलनांतील उरलेला खर्च भागविणें, हा या मदतीचा उद्देश आहे. या रकमेपैकीं ६ कोटि रुपयांशिवाय बाकी सर्व रक्कम दीर्घ मुदतीसाठी कर्ज म्हणून दिलेली आहे.

अलीकडेच झालेले नवे करार हिशेबांत धरले असतां, अमेरिकेनें भारताला स्थानिक चलनांत दिलेल्या एकंदर मदतीचा आंकडा १५४ कोटि रुपये होतो.

### पार्किन्सनचा सिद्धांत

प्रो पार्किन्सननें ग्रेट ब्रिटनमधील सरकारी वाढत्या खर्चावर मार्मिक रीतीनें टीका करण्यासाठी एक सिद्धांत मांडला, तो 'पार्किन्सन्स लॉ' ह्या नांवानें सुप्रसिद्ध आहे. "काम अशा रीतीनें वाढतें, कीं तें पार पाडण्यासाठी उपलब्ध असलेला भरपूर वेळ भरून निघावा!" हा तो सिद्धांत होय. भारताच्या मध्यवर्ति सरकारच्या खर्चांतील बेसुमार वाढ त्या दृष्टीनें उद्बोधक आहे:—

| मंत्र्याचें खातें | १९५४ मधील नोकरवर्ग | १९५८ मधील नोकरवर्ग |
|---|---|---|
| पुनर्वसाहत ... | २,६७३ | ६,३८२ |
| अन्न व शेती ... | ११,५४७ | १६,७४७ |
| शिक्षण व शास्त्रीय संशोधन... | ४,४६७ | १३,५६३ |
| अर्थ ... | ६४,३५३ | ७६,८५२ |
| गृह ... | ४,३८३ | १५,२७४ |
| व्यापार–उद्योग ... | ६,१३० | ११,०३५ |
| आरोग्य ... | ३,५१३ | ६,०१५ |
| बांधकाम, घरबांधणी, पुरवठा | ३२,६६६ | ४२,४०४ |

### महागाई कशी वाढत गेली ?

भारतांतील घाऊक किंमतीचा इंडेक्स नंबर (मार्च, १९५३ अखेरचें वर्ष = १००) १९५८–५९ च्या प्रारंभापासूनच वाढत गेला. त्या वेळीं तो १०७·४ होता; सप्टेंबरमध्यें तो ११६·३ पर्यंत चढला. ऑक्टोबर ते डिसेंबर, १९५८ ह्या मुदतींत तो थोडा खाली येऊन डिसेंबर, १९५८ मध्यें तो ११११·४ झाला. मार्च, १९५९ मध्यें तो ११२·३ होता.


महाराष्ट्रांतील व्यापारी शिक्षणाची आद्यसंस्था

## डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स

(स्थापना १९१८)

७१७ बुधवार पेठ, जिजामाताबागेजवळ, पुणें २.
टेलिफोन नंबर २३६०

नवीन वर्षाकरितां २४ जून १९५९ पासून उघडेल. जी. सी. डी., डी. कॉम्, जी. डी. सी. अँन्ड ए., सी. ए. आय्. आय्. बी., ए. सी. डब्ल्यू. ए., अकौन्टन्सी, शॉर्टहँड, टाईपरायटिंग आणि पूना युनिव्हर्सिटीचा एक्स्टर्नल प्री–डिग्री कॉमर्स कोर्स व एक्स्टर्नल बी. कॉम. डिग्री कोर्स.

सकाळ–संध्याकाळचे वर्ग.

मॅट्रिक, एस्. एस्. सी., अंडरग्रॅज्युएटस् व ग्रॅज्युएटस् यांना योग्य असे अभ्यासक्रम.

माहितीपत्रक मोफत मिळेल.

# अर्थ

बुधवार, ता. १७ जून, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## लोकशाहीच्या स्थैर्यासाठी आर्थिक विकासाची जरूरी

भारताचे कमिशनर जनरल फॉर इकॉनॉमिक अफेअर्स श्री. बी. के. नेहरू, ह्यांनीं लोकशाही राजवटीच्या आर्थिक कर्तव्यासंबंधीं कांहीं महत्त्वाचे विचार प्रकट केले आहेत. अमेरिकेंतील वेन स्टेट विद्यापीठांत विद्यार्थ्यांच्या मेळाव्यापुढें ते बोलत होते. आपल्या भाषणांत ते म्हणाले कीं, जे देश आज अविकसित आहेत त्यांना शस्त्रें पुरविण्यांत आलीं म्हणजे ते लोकशाहीच्या रक्षणासाठी खडे उभे रहातील असें नाहीं. लोकशाही राज्यव्यवस्थेला त्यांच्या दृष्टीनें कांहीं अर्थ आहे, कांहीं मूल्यें आहेत, असें त्यांना वाटेल तेव्हां मात्र ते नुसत्या हातांनींसुद्धां लोकशाहीचें रक्षण करण्यास सिद्ध होतील. आतां असा प्रश्न उपस्थित होतो कीं, अविकसित देश आज हजारों वर्षें आर्थिकदृष्ट्या मागासलेलेच असतांना आतांच त्यांना आर्थिक विकासाची एवढी घाई कां झाली आहे ? त्याचें उत्तर अंशतः असें आहे. मनुष्याच्या इतिहासांत एक गोष्ट पहिल्यानेंच उघड झालेली आहे. ती ही कीं दारिद्र्य हा कांहीं निसर्गाचा कायदा नाहीं. सामाजिक संघटनेच्या योगानें दारिद्र्यावर इलाज करतां येतो हें आतां सिद्ध झालेलें आहे. तेव्हां अविकसित देशांना आर्थिक भरभराटीची तहान लागावी ह्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. लष्करी स्वरूपाच्या हुकुमशाही राजवटी अलीकडे वाढत चाललेल्या आहेत. अविकसित देशांतहि त्यांची संख्या अधिक झालेली आहे. पण ह्या राजवटी मूलतःच अस्थिर असतात. कायदा व सुव्यवस्था ह्यांची बूज राखण्यांत अशा राजवटी कांहीं काळ यशस्वी होतात. परंतु लोकांत उत्साह निर्माण करून आर्थिक, सामाजिक अगर राजकीय प्रगति साधण्याच्या कामांत त्या नेहमींच अपयशी ठरलेल्या आहेत. आर्थिक प्रगति अगर व्यक्तिस्वातंत्र्य ह्या गोष्टींना त्या प्रेरणा देऊं शकत नाहींत.

अविकसित देशांत लोकशाही टिकवून धरावयाची असेल तर त्यांची आर्थिक प्रगति झपाट्यानें घडवून आणली पाहिजे. ह्या दृष्टीनें विचार करतां आर्थिक प्रगतीला मर्यादा घालणारीं कारणें कोणतीं आहेत, त्यांचा विचार करणें उपयुक्त ठरेल. पहिलें कारण म्हणजे शिक्षण देऊन तयार केलेल्या मनुष्यबळाचा तुटवडा. त्याचप्रमाणें, संघटनाकौशल्य अंगीं असलेलीं आणि कारभार हांकण्यांत चतुर असणारीं माणसेंहि फारशी मिळत नाहींत. दुसरें कारण म्हणजे भांडवलाचा तुटवडा. जे देश औद्योगिक दृष्ट्या प्रगत आहेत त्यांना ह्या दोन्हीं बाबतींत मदत करतां येण्यासारखी आहे. म्हणून ज्या देशांना तांत्रिक मदतीची जरूरी आहे त्यांना ती देणें आणि ज्या देशांना आर्थिक मदतीची जरूरी आहे त्यांना ती देणें अगत्याचें आहे. जगांतील प्रगत देश अविकसित देशांना आपआपल्या परीनें आर्थिक मदत करीत आहेत. ह्या मदतीच्या कार्यक्रमांत अमेरिकेचा वांटा फार मोठा आहे. पण अविकसित देशांच्या पुढें जे प्रश्न उभे आहेत त्यांची जलदीनें सोडवणूक करण्यासाठी अधिक तांतडीचे मदतीचे कार्यक्रम अंमलांत आणणें जरूर आहे. जगांतील सध्यांचें असंतुष्ट व असमाधानी वातावरण नाहींसें करण्यासाठी संपन्न लोकांनीं आपल्या जवळच्या धनाचा त्याग करून आपलें राहणीचें मान खालीं आणण्याचें कारण नाहीं. श्रीमंतांनीं आपल्या वाढत्या श्रीमंतीचा कांहीं अल्पसा अंश गरीब देशांच्या कारणी तात्पुरता लावला तरीसुद्धां काम भागण्यासारखें आहे. हें करण्यांत थोडासा त्याग आहे. पण तो न केला तर त्याचे परिणाम कल्पनेच्याहि पलीकडील होतील. आज जग फार लहान झालेलें आहे. आणि अविकसित देशांच्या शेजारींच प्रगत व श्रीमंत देश नांदत आहेत, हें लक्षांत घेतलें पाहिजे.

---

## जेट विमानांमुळें परदेशी पाहुणे वाढणार आणि हॉटेलें कमी पडणार

१९६१ चे सुमारास बहुतेक आंतरराष्ट्रीय विमानवहातूक कंपन्या जेट विमानांचा वापर करूं लागतील आणि वहातुकीचे दर २५% नें उतरतील, असा अंदाज अमेरिकन सोसायटी ऑफ ट्रॅव्हल एजंट्सचे अध्यक्ष, मि. मॅक्स बी. ॲलन, ह्यांनीं दिल्ली येथें नुकताच व्यक्त केला. जेट प्रवासामुळें जग ४०% नें संकुचित झालें आहे; त्यामुळें अधिकाधिक लोक जगपर्यटन करूं लागतील आणि भारतांत येणाऱ्या प्रवाशांची संख्या खूपच वाढेल. त्याचा एक परिणाम म्हणजे हॉटेलांतील उतरण्याच्या सोयींचा तुटवडा भासूं लागेल. त्यावर वेळींच उपाययोजना करायला हवी. अशोक हॉटेलसारख्या फॅशनेबल हॉटेलांची आवश्यकता नाहीं; सोयी चांगल्या असल्या म्हणजे पुरे. कारण, आंतरराष्ट्रीय प्रवासी एका जागीं फार काळ रहातात कुठें ? बहुतेक वेळ ते बाहेरच काढतात. मि. ॲलन ह्यांनीं भारत सरकारच्या प्रतिनिधींशीं आंतरराष्ट्रीय वहातूकविषयक प्रश्नांची चर्चा केली.

---

## मोटारवहातुकींत रेल्वेजची गुंतवणूक

हिंदी रेल्वेज चालू वर्षांत आंध्र, बिहार आणि म्हैसूर राज्यांतील मोटारवहातुकीमध्यें ५० लक्ष रुपयांची गुंतवणूक करणार आहे. त्यांपैकी २२.५ लक्ष रुपये आंध्रच्या, १७.५ लक्ष रुपये म्हैसूरच्या आणि १० लक्ष रुपये बिहारच्या वांट्याला जातील. रेल्वेजनीं कित्येक राज्यांतील मोटारवहातुकींत ह्यापूर्वी कांहीं कोटि रुपये गुंतविलेले आहेत.

---

**पोलिओवरील नवीन औषध**—डॉ. अल्बर्ट सॅबिन ह्या अमेरिकन संशोधकानें पोलिओ रोगावर शोधून काढलेल्या नव्या औषधाचा प्रयोग रशिआंतील व झेकोस्लोव्हाकिआंतील हजारों मुलांवर करण्यांत आला आहे. डॉ. सॉक ह्यांनीं शोधलेल्या लसीपेक्षा नवीन औषध अधिक परिणामकारी ठरल्याचें समजतें. नवीन औषध तोंडानें घ्यावयाचें आहे.

# THE POONA INVESTORS

## BALANCE SHEET AS

| 31-12-1957 | CAPITAL & LIABILITIES | 31-12-58 | |
|---|---|---|---|
| Rs. nP. | | Rs. nP. | Rs. nP. |
| | **1. Capital** | | |
| 100,000 | *Authorised and issued:* 100 Shares of Rs. 100/- each ... | | 100,000 |
| 65,000 | *Subscribed and paid up:* 65 Shares of Rs. 1,000/- each fully paid. ... | | 65,000 |
| 15,291—01 | | | |
| 7—61 | **2. Reserve Fund and Other Reserves:** ... | | |
| 15,298—62 | Balance as per last Balance Sheet. ... | 15,298—62 | |
| | Addition During the year. ... | 302—38 | 15,601—00 |
| | **3. Deposits and Other Accounts** | | |
| 362,184—87 | Fixed Deposits ... | 338,784—87 | |
| 359,278—33 | Savings Bank Deposits ... | 364,363—80 | |
| 417,519—84 | Current Accounts, Contingency Accounts etc. ... | 482,180—44 | 11,85,329—11 |
| 11,38,983—04 | | | |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| Nil | (i) In India ... | Nil | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | Nil |
| | **Particulars** | | |
| | (i) Secured ... | Nil | |
| | (ii) Unsecured ... | Nil | Nil |
| 116—10 | **5. Bills Payable** ... | | 2,453—73 |
| | **6. Bills for Collection, being Bills Receivable as per Contra:** | | |
| 13,548—36 | (i) Payable in India ... | 11,718—40 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | 11,718—40 |
| 13,548—36 | | Nil | |
| | **7. Other Liabilities** | | |
| 1,123—44 | Sundry Creditors ... | | 859—84 |
| Nil | **8. Acceptances, Endorsements and other obligations as per Contra:** | Nil | Nil |
| | **9. Profit and Loss Account:** | | |
| 65—96 | Profit as per last Balance Sheet. 335—22 | | |
| 269—26 | Less: Appropriations :— | | |
| 335—22 | 1 General Reserve 302—38 | | |
| | 32—84 | 32—84 | |
| 12,34,404—78 | Carried Over Rs. ... | | 12,80,962—08 |

# BANK LIMITED, POONA.

## AT 31st DECEMBER, 1958

| 31-12-1957 | PROPERTY & ASSETS | 31-12-1958 | |
|---|---|---|---|
| Rs. nP. | | Rs. nP. | Rs. nP. |
| | 1. Cash | | |
| 77,242—74 | In hand and with Reserve Bank and State Bank ( Including foreign currency notes ) ... | | 56,146—37 |
| 83,575—63 | 2. Balances with Other Banks ( On Current Accounts ) | | |
| | ( i ) In India ... | 1,21,873—64 | |
| | ( ii ) Outside India ... | Nil | 1,21,873—64 |
| Nil | 3. Money at Call and Short Notice ... ( Short term deposit with Banking Companies ) ... | | Nil |
| | 4. Investments at cost ... ( Market Value Rs. 4,05,582—00 ) ( Face Value Rs. 4,54,500/- ) | | |
| 4,47,877—84 | ( i ) Securities of the Central and State Governments and other trustee securities, including Treasury Bills of the Central and State Governments. ( Includes Securities of the face value of Rs. 4,50,000/- Deposited with other Banks for over-draft arrangement ). ... | 447,877—84 | |
| Nil | (ii) Shares. ... | Nil | |
| Nil | (iii) Debentures or Bonds ... | Nil | |
| Nil | (iv) Other Investments ... | Nil | |
| 68—00 | (v) Gold ... | 68—00 | 4,47,945—84 |
| 4,47,945—84 | | | |
| | 5. Advances ( Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors ). | | |
| 4,20,659—32 | ( i ) Loans, Cash Credits, Overdrafts etc. In India ... | 4,14,193—37 | |
| Nil | Outside India ... | Nil | |
| 4,20,659—32 | (ii) Bills Discounted and Purchased ( Excluding Treasury Bills of the Central and State Governments). | | |
| 65,590—41 | (a) Payable in India ... | 60,712—63 | |
| 4,86,249—73 | (b) Payable outside India ... | Nil | 4,74,906—00 |
| | Carried over Rs. ... | | 11,00,871—85 |

| Particulars of Advances and Bills | Bills Discounted and Purchased | Advances |
|---|---|---|
| ( i ) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured. ... | 6295—69 | 2,39,584—90 |
| (ii) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security. ... | | 17,799—27 |
| (iii) Debts considered good and Secured by the Personal Liabilities of one or more parties in addition to the personal security of the Debtors | 54416—94 | 1,56,809—20 |
| (iv) Debts considered doubtful or Bad, not provided for | Nil | Nil |
| | 60,712—63 | 4,14,193—37 |
| (v) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | Nil | 2,375—17 |
| (vi) Debts due by Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies, as Members. ... | Nil | Nil |
| (vii) Maximum total Amount of Advances including Temporary Advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person. ... | Nil | 2,666—29 |

# THE POONA INVESTORS

## BALANCE SHEET AS

| 31-12-1957 | CAPITAL & LIABILITIES | 31-12-1958 | |
|---|---|---|---|
| | | Rs. nP. | Rs. nP. |
| | Brought forward ... | 32—84 | 12,80,962—08 |
| | Add :—Net profit for the year ( subject to depreciation taxation ) brought from the profit and Loss Account. ... | 318—76 | 351—60 |
| 12,34,404—78 | Total Rs. ... | | 12,81,313—68 |

## PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31st DECEMBER, 1958.

| 31-12-1957 | EXPENDITURE | 31-12-1958 | |
|---|---|---|---|
| | | Rs. nP. | Rs. nP. |
| 31,890—59 | 1 Interest paid on deposits, and Borrowings etc. ... | | 32,630—22 |
| | 2 Salaries and Allowances and Provident Fund :— | | |
| 7,200—00 | Managing Director, 7,200 ... | 7,200—00 | |
| 14,329—58 | Others. ... | 17,505—68 | 24,705—68 |
| 645—00 | 3 Directors' and Local Committee Members' Fees and Allowances. ... | | 795—00 |
| 2,556—01 | 4 Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | | 2,528—00 |
| Nil | 5 Law Charges. ... | | Nil |
| 724—40 | 6 Postage, Telegram and Stamps and Telephone. ... | | 865—73 |
| 400—00 | 7 Auditors' Fees. ... | | 400—00 |
| 60—75 | 8 Depreciation on and repairs to Banking Company's Property. ... | | 306—91 |
| 2,586—96 | 9 Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 2,544—32 |
| Nil | 10 Loss from sale or dealing with non-banking assets. ... | | Nil |
| | 11 Other Expenditure. | | |
| 30—00 | Filing and other Fees ... | 30—00 | |
| 1,261—01 | Miscellaneous Expenses ... | 2,452—04 | 2,482—04 |
| 269—26 | 12 Balance of Profit ( subject to taxation ) transferred to Balance Sheet. ... | | 318—76 |
| 61,953—56 | Total Rs. ... | | 67,576—66 |

| 31-12-1957 | INCOME ( Less provisions made during the year for Bad and Doubtful debts and other usual or necessary provisions). | 31-12-1958 | |
|---|---|---|---|
| | | Rs. nP. | Rs. nP. |
| 55,594—86 | 1. Interest and Discount. ... | | 61,011—88 |
| 3,638—84 | 2. Commission, Exchange and Brokerage :— ... | | 3,809—85 |
| 344—00 | 3. Rents. ... | — | Nil |
| Nil | 4. Net Profit on sale of Investments, gold and silver, land premises and other assets ( Not credited to Reserves or to any particular fund or account ). ... | | Nil |
| Nil | 5. Net profit on revaluation of Investments, gold and silver, land, premises and other assets ( Not credited to Reserves or any particular fund or account. ) ... | | Nil |
| Nil | 6. Income from Non-banking assets and profit from sale of or dealing with such assets. ... | | 785—45 |
| | 7. Other Receipts. | | |
| 1,269—99 | 1. Ledger Fees ... | 1,774—48 | |
| 100—00 | 2. Siting Fees ... | 50—00 | |
| 4—00 | 3. Share Transfer Fee ... | Nil | |
| 1—87 | 4. Miscellaneous Receipts. ... | 145—00 | 1,969—48 |
| 61,953—56 | Total Rs. ... | | 67,576—66 |

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have audited the above Balance Sheet of the Poona Investors Bank Limited, as at 31st December, 1958 and also the annexed Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisions to sub-sections ( 1 ) and ( 2 ) of section 211 and sub-section (5) of section 211 and 227 ( 5 ) of Companies Act, 1956, the Balance-Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the Sixth Schedule to the Companies Act, 1956; The Accounts are, therefore, drawn up in conformity with Forms A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

# BANK, LIMITED POONA.

**AT 31st DECEMBER, 1958**

| 31-12-1957 | PROPERTY & ASSETS | 31-12-1958 Rs. nP. Bills Discounted and Purchased | 31-12-1958 Rs. nP. Advances |
|---|---|---|---|
| | **Particulars of Advances and Bills ( contd. )** | | |
| | (viii) Maximum total amount of Advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents or in the case of the private companies, as Members ... | Nil | 38,190—76 |
| | (ix) Due from Banking Companies ... | Nil | Nil |
| | Brought over ... | | 11,00,871—85 |
| | **6. Bills Receivable, being Bills for Collection** as per contra. | | |
| 13,548—36 | ( i ) Payable in India ... | 11,718—40 | 11,718—40 |
| Nil | ( ii ) Payable outside India ... | Nil | |
| 13,548—36 | | | |
| Nil | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and other Obligations as per Contra :** ... | | Nil |
| | **8. Premises ( at cost )** | | |
| 47,888—51 | Balance as per last Account ... | 47,888—51 | |
| 1,138—81 | Less Depreciation written off. ... | 1,138—81 | 46,749—70 |
| 46,749—70 | | | |
| | **9. Furniture and Fixtures, at cost** | | |
| 7,670—78 | As per last Balance Sheet ( at cost ) ... | 7,670—78 | |
| Nil | Add : Additions during the Year. ... | Nil | |
| 7,670—78 | | 7,670—78 | 7,61[illegible]—16 |
| 60—62 | Less : Depreciation written off. ... | 60—62 | |
| 7,610—16 | | | |
| | **10. Other Assets** | | |
| 155—81 | Liabrary Books ... | 161—43 | |
| 7,367—02 | Stock of Printing and Stationery as certified by the Manager, Director ... | 6,367—02 | |
| 231—32 | Stamps on Hand ... | Nil | |
| 14,622—03 | Income Tax paid at source ... | 10,209—58 | |
| 40,498—32 | Advances and Deposits ... | 38,934—67 | |
| 2,571—78 | Interest accrued and Due ... | 11,002—78 | |
| 5,550—34 | Rent Receivable ... | 4,804—34 | |
| 486—00 | Prepaid Insurance ... | 486—00 | 71,965—82 |
| 71,482—62 | | 71,965—82 | |
| | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** ... | | 42,397—75 |
| 12,34,404—78 | Total Rs. ... | | 12,81,313—68 |

We report that :—

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory; (b) the transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank; (c) in our opinion, proper books of account as required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books; (d) the Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account (e) in our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Companies Act, 1956, in the manner so required for Banking Companies, and on such basis subject to arrears of depreciation the said Balance Sheet, gives a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st December, 1958, and the Profit and Loss Account gives a true and fair view of the profit for the year ended up to that date.

Poona
28th March 1958.

**G. D. APTE, & Co.**
Chartered Accountants.

**T. R. Thakar**
*Accountant*

**K. B. Salvekar**
*Managing Director.*

**G. S. Adkar,**
*Chairman.*

Mr. V. V. Vartak did not sign as he has resigned his post.

Poona
28 March 1958.

**M. B. Salvekar**
**H. M. Bafana**
**S. N. Vaidya**
} *Directors*

# THE POONA INVESTORS BANK, LIMITED POONA.

## REPORT OF 1958.

Your Directors beg to submit Balance Sheet and Profit and Loss Account for the year ended 31st December 1958 duly certified by the Auditors.

This is our 13th Report. 9½ years are passed since we have started our Banking Business i. e. this is 9th year of Banking Business.

It will be seen that the transanctions of the Bank during the year under report, after meeting all the expenses resulted in a Profit of Rs. 318—76.

| | |
|---|---|
| Profit during the year | |
| As per Profit and Loss A/c. | 318—76 |
| Last year's Profit. | 32—84 |
| | 351—60 |
| Which your Directors recommend to be appropriated as under | |
| To Rererve Fund | 300—00 |
| Balance to be Carried Forward | 51—60 |
| | 351—60 |

Under article 99 of the Articles of Association Shri H. M. Bafna and Shri. S. N. Vaidya retire by rotation. They are eligible and offer themselves for re-election.

During the year the Board of the Directors worked enthusiastically and in co-operation. Personally I am thankful to them.

You are requested to appoint auditors for the current year and fix their remuneration.

For and On behalf of the Board of Directors.

G. S. ADKAR

*Chairman.*

**जपानकडून तांत्रिक मदत**—भारताचे उद्योगमंत्रि सध्यां जपानच्या दौऱ्यावर आहेत. जपानच्या तांत्रिक साह्यानें भारतांत नवीन कारखाने काढण्यासंबंधीं ते जपानच्या सरकारशीं वाटाघाटी करीत असून त्या बऱ्याच प्रमाणांत यशस्वी होत आहेत. घड्याळें, कांच व कृत्रिम रेशमासाठी लागणाऱ्या लगद्याचा कारखाना काढण्याच्या कामीं जपानचें साह्य मिळण्याची शक्यता आहे.

**कृष्णाच्या मूर्तीची भेट**—लेनिनग्राड येथें हर्मिटेज म्युझिअम ह्या नांवाचें रशिआंतील एक सर्वांत मोठें कलावस्तु-संग्रहालय आहे. ह्या संग्रहालयाला श्रीकृष्णाची एक हस्तिदंतांत कोरलेली कलापूर्ण मूर्ति त्रावणकोरच्या महाराजांनीं भेट म्हणून पाठविली आहे. त्रावणकोरच्या महाराजांनीं गेल्या वर्षीं ह्या संग्रहालयाला भेट दिली होती.

**मुंबई राज्यांतील कातड्याचा धंदा**—मुंबई राज्यांतील कातड्याच्या धंद्याची सर्वांगीण पहाणी करण्यासाठी राज्य-सरकारनें ६ जणांची एक कमिटी नेमली आहे. कमिटीनें धंद्याची अधिक चांगली संघटना व विकास करण्याविषयीं आणि उत्पादित मालाला बाजारपेठ मिळविण्याविषयीं सूचना करावयाच्या आहेत.

**दहा वर्षांत चंद्रलोकावर प्रयाण**—पश्चिम जर्मनींतील अग्निबाणविषयक शास्त्राच्या एका तज्ज्ञानें असें भाकीत केलें आहे कीं, दहा वर्षांच्या अवधींत मनुष्याला चंद्रावर जाऊन वस्ती करतां येणें शक्यतेच्या कोटींत येईल. मनुष्याला चंद्रावर लागणारा प्राणवायु व पाणी तेथील खडकापासून मिळूं शकेल असा त्याचा अंदाज आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.